28-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 27-01-2025 23:38 Page 1

निवडक

सखाराम बोरकर, महेश पारकर, नामदेव सुर्लीकर

कोकणी कविता लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २७ : अपूर्व प्रकाशन, मंगेशीतर्फे आयोजित केलेल्या दुसऱ्या स्व. संजीव वेरेकर यांच्या स्मरणार्थ अखिल भारतीय कोंकणी कविता लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.

या स्पर्धेत ५ हजार रुपयांचे पहिले बक्षीस कवी सखाराम बोरकर यांना प्राप्त झाले तर स्पर्धेतील ३ हजार रुपयांचे दुसरे बक्षीस कवी महेश पारकर यांना प्राप्त झाले. २ हजार रुपयांचे तिसरे बक्षीस नामदेव सुर्लीकर यांना मिळाले. शिवाय १ हजार रूपयांची उत्तेजनार्थ बक्षिसे इंदू गिरीसप्पे व एनी दी कोलवाळे यांना प्राप्त झाली. विजेत्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र मार्च महिन्यात होणाऱ्या विशेष कार्यक्रमात देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे परीक्षण नामवंत कोषकार, निबंधकार मुकेश थळी आणि साहित्यीक प्राचार्य सुभाष जाण यांनी केले. या स्पर्धेत एकूण ७२ कवींनी सहभाग घेतला होता. सदर निकाल अपूर्व प्रकाशनाचे स्नेहा आणि समिधा वेरेकर यांनी जाहीर केला.

अपूर्वा विनायक कामत हिचे अभिनंदनिय यश



■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २७ : पेडणे येथील अपूर्वा विनायक कामत हिने विजयराव नाईक कॉलेज ऑफ फार्मसी, शिखळ–कणकवली या कॉलेज मधील बी फार्मच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेला अपूर्वा विनायक कामत हिने राष्ट्रीय स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेत स्पृहाणिय यश संपादन केले आहे. या स्पर्धेची थीम होती – 'सजिव पेशींच्या केंद्रात असलेले रसायन जे प्रलेक पेशीच्याची रचना आणि उद्देश्य ठरविते. पुनरुत्पादन होतान याव्दारे आनुवांशिक माहिती पुढे नेली जाते. अशा क्रांतिकारक अज्ञात न्यायवर्धक डि.एन.ए. पॅथॉलॉजी या वर अपूर्वा हिने दीप फॉउंडेशनने आयोजित केलेला वक्तृत्व स्पर्धेत राष्टीय पातळीवर तिसरा क्रमांक मिळवून आपला नावा प्रमाणे 'अपूर्व' यश प्राप्त केले.

तीच्या या यशस्वी पूर्तीने तीला रोख रक्कम, प्रभाणपत्र आणि चषक (ट्रॉफी) याने पुणे येथे सन्मानित केले जाणार आहे. अपूर्वाच्या यशामागे नीचे वडील विनायकराव कामत आई सौ. कामत तसेच कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापका कॉलेजिअन मित्रमंडळी यांचे प्रोत्साहन मिळाले. म्हणूनच मी हे यश प्राप्त करू शकले असे अपूर्वा नम्रपणे सांगते. यापुढेही असेच यश प्राप्त करावे.

वेरे – वाघुर्मेची २ फेब्रुवारीला ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २७ : वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायतीची ग्रामसभा येत्या रविवारी दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सावईवेरे येथील ग्रामीण वाचनालयाच्या सभागृहात बोलाविण्यात आली आहे. या ग्रामसभेत जर कुणाला ठराव मांडायचे असल्यास त्यांनी शुक्रवार दि. ३१ जानेवारी पर्यंत सरपंच किंवा उपसरपंच यांच्या स्वाधीन लेखी स्वरूपात द्यावेत, असे कळविण्यात आले आहे. तरी या सभेस सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच शोभा पेरणी यांनी केले आहे.

शिवोली सार्वजनिक गणेश विश्वस्त मंडळातर्फे १ फेब्रुवारीला गणेश जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २७ : शिवोली सार्वजनिक गणेश विश्वस्त मंडळातर्फे शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी गणेश जयंती साजरी होणार आहे, त्यानिमित्त सकाळी धार्मिक विधी व अथर्वशीर्ष पारायण यजमान पद श्वेता व संतोष रायकर यांना लाभले आहे. १२.३० वाजता गणेश जन्म पाळणा सोहळा दुपारी आरती महाप्रसाद महाप्रसाद पुरस्कृत प्रकाश फुलारी रात्री आठ वाजता नाट्य गीत, भावगीत व भक्ती गीतांचा बहारदार कार्यक्रम स्वर संध्या गायक रूषिकेश रानडे, श्रुती जैन, निवेदक अनुश्री देशपांडे दिनांक दोन रोजी श्रींचा ९२ वा वर्धापन दिन त्यानिमित्त धार्मिक विधी यजमान अमिषा व अमन च्यारी दुपारी १ वाजता सुहासिनी तर्फे जोडवी दीपोत्सव १.३० वाजता आरती म महाप्रसाद रात्री वाजता नाटक अक्षुची झाली फुले. पुरकृत रामा परब, दि. ३ रोजी रात्री ८ वाजता कै. रामा पेडणेकर यांच्या पुण्यस्मरणथ नाटक कोणाचे खर दि. ४ रोजी साप्ताहिक मंगळवार प्रित्यर्थ सकाळी धार्मिक विधी यजमान सरस्वती व शिवा चोडणकर १.३० वाजता आरती व महाप्रसाद. संध्याकाळी ७.३० वाजता 'स्वर गणेश' हा नाट्य गीत, भावगीत, भक्ती गीताचा कार्यक्रम गायक ओंकार च्यारी दिप्ती गावस.

सावंतवाडी : शैक्षणिक सहलीत सहभागी घाणो – सावई येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक, पालक व विद्यार्थी.

घाणो – सावई सरकारी विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २७ : घाणो – सावई येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल यावर्षी सावंतवाडी (महाराष्ट्र) येथे संपन्न झाली. या सहलीत शाळेचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी,शिक्षकआणि पालक मिळून एकूण पंचेचाळीस जणांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांना रेल्वे प्रवासाचा् अनुभव मिळावा या उद्देशाने करमळी (गोवा) ते सावंतवाडी हा प्रवास कोकण रेल्वेने केला. सावंतवाडी येथील अनेक प्रेक्षणीय स्थळे मुलांनी पाहिली व या सहलीचा मनसोक्त आस्वाद घेतला.

रोहित शर्माची मुंबई रणजी ट्रॉफीतून माघार

मुंबई, दि. २७ : भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माने तब्बल १० वर्षांनंतर रणजी क्रिकेट खेळले. मुंबईच्या संघाकडून खेळताना तो दोनही डावात फारशी चमक दाखवू शकला नाही. याआधी भारतीय संघात आणि मग मुंबई रणजीमध्ये अपयशी ठरलेल्या रोहित शर्माने अखेर नाईलाजाने एक मोठा निर्णय घेतला आहे. वृत्तानुसार, रोहितने इंग्लंड विरुद्धची एकदिवसीय मालिका आणि त्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीमुळे रणजी ट्रॉफीमध्ये यापुढे न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत त्याने मुंबई संघ व्यवस्थापनालाही कळवले आहे. त्यामुळे रोहित शर्मा आता यापुढे रणजी ट्रॉफी २०२४–२५ च्या पुढील फेरीत खेळणार नाही.दुसरीकडे, यशस्वी जैस्वालही मुंबईच्या पुढील रणजी सामन्यात दिसणार नाही. इंग्लंडची मालिका आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी तो भारतीय संघाचा एक भाग आहे. त्यामुळे तोदेखील भारतीय संघासोबतच सराव करताना दिसेल. रोहित शर्माने इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिका आणि त्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफी डोळ्यासमोर ठेवून पुन्हा एकदा वनडे क्रिकेटवरच लक्ष केंद्रित करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

बुमराह २०२४ चा आयसीसी सर्वोत्कृष्ट कसोटी क्रिकेटपटू

नवी दिल्ली, दि. २७ :

भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड कोणताही देश असो किंवा खेळपट्टी असो विकेटची १०० टक्के खात्रा म्हणजे जसप्रीत बुमराहची भेदक गोलंदाजी. आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंना घाम फोडणाऱ्या बुमराहने आयसीसीचा पुरस्कार जिंकत इतिहास घडवला.

जसप्रीत बुमराह २०२४ चा आयसीसी सर्वोत्कृष्ट कसोटी क्रिकेटपटू ठरला आहे. बुमराह हा पुरस्कार जिंकणारा भारताचा सहावा खेळाडू तर भारतीय संघाचा पहिलाच वेगवान गोलंदाज ठरला. बुमराहच्या आधी राहुल द्रविड (२००४), गौतम गंभीर (२००९), वीरेंद्र सेहवाग (२०१०), रविचंद्रन अश्विन (२०१६) आणि विराट कोहली (२०१८) यांनी हा पुरस्कार पटकावला होता. बुमराहने २०२४ मध्ये १३ कसोटी सामन्यांमध्ये सर्वाधिक ७१ विकेट घेत सर्वच गोलंदाजांना मागे टाकलं.

जसप्रीत बुमराहसाठी २०२४ हे वर्ष खूप चांगले गेले. कसोटी क्रिकेटमध्ये तर बुमराहने ऐतिहासिक स्पेल टाकत सर्वांनाच चकित केले.२०२३ च्या अखेरीस पाठीच्या दुखापतीतून बरा झाल्यानंतर बुमराहने कसोटीत पुनरागमन केले आणि २०२४ मध्ये तो भारताचा सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक राहिला. गेल्या वर्षी मायदेशात इंग्लंड आणि बांगलादेशविरुद्धच्या कसोटी संघाच्या विजयात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियामध्येही बुमराहने आश्चर्यकारक कामगिरी केली.

जसप्रीत बुमराहने २०२४ मध्ये एकूण १३ कसोटी सामने खेळले. यादरम्यान त्याने १४.९२ च्या सरासरीने ७१ विकेट घेतल्या. गेल्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बुमराह त्याच्याशिवाय इतर कोणत्याही गोलंदाजाला ६० विकेट्सचा आकडाही गाठता आला नाही. कसोटी इतिहासात एका कॅलेंडर वर्षात ७० अधिक विकेट्स घेणाऱ्या १७ गोलंदाजांपैकी कोणत्याच गोलंदाजाने बुमराहइतक्या कमी सरासरीने विकेट्स घेतलेल्या नाही. त्याच वेळी, बुमराह हा भारताचा फक्त चौथा गोलंदाज आहे ज्याने एका कॅलेंडर वर्षात ७० अधिक कसोटी विकेट घेतले आहेत.

स्मृती मंधाना हिला महिला वनडे क्रिकेटर ऑफ इयरचा किताब

नवी दिल्ली, दि. २७ :

भारतीय क्रिकेटपटू स्मृती मंधाना हिला महिला वनडे क्रिकेटर ऑफ इयरचा किताब मिळाला आहे. पुरुषांमध्ये, अफगाणिस्तानचा अष्टपैलू अजमतुल्ला ओमरझाई याला वर्षातील एकदिवसीय क्रिकेटपटू म्हणून निवडण्यात आले. आयसीसीने सोमवारी एकदिवसीय पुरस्कारांच्या घोषणेमध्ये ही माहिती दिली.

२०२४ पूर्वी, मंधानाला २०१८ आणि २०२२ मध्ये महिला वनडे क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कार देखील मिळाला आहे. तिने २०२४ मध्ये १३ सामन्यात ७४७ धावा केल्या होत्या. अजमतुल्लाने ४१७ धावा केल्या आणि १७ विकेट्सही घेतल्या.

भारतीय उपकर्णधार स्मृती मंधानाने गेल्या वर्षी एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४ शतके झळकावली होती. तिने वर्षाची सुरुवात ऑस्ट्रेलियाविरुद्ध २९ चेंडूत २९ धावा करून केली. यानंतर तिला पुढील वनडेसाठी सहा महिने वाट पाहावी लागली. मंधानाने २०२४ मध्ये तीन अर्धशतकेही झळकावली होती. या काळात तिची सर्वोत्तम धावसंख्या १३६ धावा होती.

स्मृतीच्या ७४७ धावा या एका कॅलेंडर वर्षात तिने केलेल्या सर्वाधिक धावा आहेत. गेल्या वर्षी तिने ५७.८६ च्या सरासरीने आणि ९५.१५ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. मंधानाने २०२४ मध्ये ९५ चौकार आणि ६ षटकार मारले होते.

आयसीसीने अलीकडेच महिला वनडे संघाची घोषणा केली होती, ज्यामध्ये दोन भारतीय खेळाडूंना स्थान मिळाले होते. यामध्ये फलंदाज स्मृती मंधाना आणि अष्टपैलू दीप्ती शर्मा यांच्या नावाचा समावेश आहे.

आयसीसीने अफगाणिस्तानच्या अजमतुल्ला ओमरझाईला २०२४ सालचा एकदिवसीय क्रिकेटपटूचा पुरस्कार दिला. २०२४ मध्ये खेळल्या गेलेल्या १७ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ४१७ धावा केल्या आणि १७ बळीही घेतले. या कालावधीत त्याची सरासरी ५२.१२ राहिली आहे. ओमरझाईने २०.४७ च्या सरासरीने विकेट घेतल्या.

पर्ये शाळा समूहाचा क्रीडा मेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २७ : शाळा समूह पर्ये, आयोजित क्रीडा मेळावा उत्साही वातावरणात भूमिका मैदानावर झाला. या क्रीडा मेळाव्यात पर्ये समूहातील आठ शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.सर्व शाळांतील शिक्षक विद्यार्थी पालक कार्यक्रमासाठी मुलांचा उत्साह वाढविण्यासाठी उपस्थित होते. या मेळाव्यासाठी भूमिका माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिवाकर पोसनाईक प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.तसेच क्रीडा शिक्षक आनंद गावकर,सरकारी प्राथमिक विद्यालय पर्येच्या मुख्याध्यापिका उमा केळकर–जोशी, सचिव गीता केरकर, पर्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुकुंद सावंत, समग्र शिक्षा अभियानाचे सीआरपी गोविंद गावस, भारती गावस उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आरंभी पाहुण्याच्या हस्ते क्रीडाध्वज फडकावून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतर मुलांनी क्रीडा शपथ घेतली.पाहुण्याच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून मुलांनी मैदानावर फेरी मारली व स्पर्धेला सुरुवात केली.

प्रमुख पाहुणेदिवाकर पोसनाईक म्हणाले,प्रत्येकाने खेळ खेळले पाहिजेत,खूप व्यायाम केला पाहिजे,खेळातून मुलांची शारीरिक क्षमता वाढीस लागते.सर्व शाळेतील मुलांनी यावेळी ड्रिल सादर करून सर्वांची मने जिंकली .सौ गीता केरकर यांनी आभार व्यक्त केले तसेच अर्जुन गावस ,ओंकार वझे, व चुडामणी गावस यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या क्रीडा मेळाव्यात इयत्ता पहिली,दुसरी,तिसरी आणि चौथीतील मुलांसाठी दोरी उड्या,बटाटे शर्यत,५० मीटर धावणे,१०० मीटर धावणे ,रीले,लिंबू चमचा अश्या अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व मुलांनी अतिशय सुंदर असा सहभाग दर्शविला.सर्व शिक्षक,पालकांनी खूप सहकार्य करून हा मेळावा यशस्वी केला.या क्रीडा मेळाव्याला क्रीडा शिक्षक आनंद गावकर यांचे मार्गदर्शन लाभले.या मेळाव्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी दिलीप गावकर यांनी भूमिका मैदान उपलब्ध करून दिले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

उगतें मळब संस्थेच्या पहिल्या बहुभाषिक कवी संमेलनाचे शानदार सादरीकरण

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २७ : प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला उगतें मळब संस्थेच्या २०२५ वर्षातील पहिल्या बहुभाषिक कवी संमेलनाचे शानदार सादरीकरण झाले. कोकणी अकादमीच्या शणै गोंयबाब सभागृहात चाललेल्या हे कवी संमेलनात तब्बल २० कवींनी आपल्या दर्जेदार कविता सादर केल्या. सुरवातीला उगतें मळब संस्थेचे अध्यक्ष विवेक पिसुर्लेकरानी सर्वांचे स्वागत केले. आणि गोवा सरकारच्या उर्बा पुरस्कार विजेते अविनाश कुंकळकर आणि कला गौरव पुरस्कार विजेते अँथनी वाझ यांचे उगतें मळब तर्फे अभिनंदन केले. संमेलनाची सुरुवात श्रीमती गुलाब वेर्णेकर यांनी आपल्या दोन सहज सुंदर कविता सादरीकरणाने केली. कांकणकार आणि इंटरनेटचे पिशें ह्या त्यांच्या कविताना रसिकांनी मनसोक्त दाद दिली. त्या नंतर श्रीमती ऍनी द कोलवाळे या तियात्रिस्त कवयित्रीने सादर केलेल्या युद्धातील सैनिकाच्या होतात्म्यावर आधारित हांव वेतां माय ह्या कवितेच्या भावपूर्ण सादरीकरणाने सगळे वातावरण भावपूर्ण वीर रसाने गद्गदून टाकले.

या अशा गंभीर वातावरणांत श्रीमती नुतन दाभोळकर यांनी आपल्या परक्याचे धन या मायलेकीच्या नात्या वर आधारित कविता सादर करून उपस्थितांची मने हेलावून सोडली. याच वेळी श्रीमती संगिता म्हापणे, श्रीमती पुष्पा नायक आणि श्रीमती नागरत्ना कुडतरकर यांनी आपल्या जोरदार कविता सादर करतना रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्या नंतर श्रीमती सोनिया शाह, सोबित सपना वाऱ्यार आणि आमचो बाबुलो, ऍंना फेरेरा अमर सैनिक आणि आंग शिरशिरता आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेते निलबा खांडेकर जीण. सुभाष शाह, पाषाणा चे काळीज तसेच वंदना न्हावेलकार, ती आनी आमी आणि मोगा एकुच सांग आणि अनधा कामत, लोकनायक आंबेडकार आणि पर्वरी म्हजो गाव, शीतल साळगावकर यांनी ती संवसाराक हासोवन फटयता आणि हो पावस तसेच उगतें मळब संस्थेचे अध्यक्ष विवेक पिसुर्लेकरांनी आणि कालच गोवा सरकारच्या उर्बा पुरस्कार विजेते अविनाश कुंकळकर आणि कला गौरव पुरस्कार विजेते अँथनी वाझ यांनी ही आपल्या बहारदार कविता सादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली. या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरिक, कवी आणि माजी दृकश्राव्य माध्यम पत्रकार दर्शन लोलंयेकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सगळ्या कवींचे कौतुक केले आणि उगतें मळब संस्थेचे अध्यक्ष विवेक पिसुर्लेकरानी सर्वांसाठी निस्वार्थीपणे चालवलेल्या या कवी संमेलनाच्या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद देऊन कोंकणी भाषेतल्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेण्याचे आवाहन केले. या संपूर्ण कवी संमेलनाचे सुत्रसंचलन श्रीमती शितल साळगावकर यांनी केले आणि सगळ्या कवींचे आणि उपस्थित रसिकांचे आभार मानले.

पर्ये शाळा समूहाचा क्रीडामेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्ये : शाळा समूहाच्या क्रीडा मेळाव्याची मशाल प्रज्वलित करताना दिवाकर पोसनाईक. सोबत आनंद गावकर, उमा केळकर–जोशी, गीता केरकर, गोविंद गावस, भारती गावस व इतर.

साखळी, दि. २७ : शाळा समूह पर्ये, आयोजित क्रीडा मेळावा उत्साही वातावरणात भूमिका मैदानावर झाला. या क्रीडा मेळाव्यात पर्ये समूहातील आठ शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.सर्व शाळांतील शिक्षक विद्यार्थी पालक कार्यक्रमासाठी मुलांचा उत्साह वाढविण्यासाठी उपस्थित होते. या मेळाव्यासाठी भूमिका माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिवाकर पोसनाईक प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.तसेच क्रीडा शिक्षक आनंद गावकर,सरकारी प्राथमिक विद्यालय पर्येच्या मुख्याध्यापिका उमा केळकर–जोशी, सचिव गीता केरकर, पर्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुकुंद सावंत, समग्र शिक्षा अभियानाचे सीआरपी गोविंद गावस, भारती गावस उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आरंभी पाहुण्याच्या हस्ते क्रीडाध्वज फडकावून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतर मुलांनी क्रीडा शपथ घेतली.पाहुण्याच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून मुलांनी मैदानावर फेरी मारली व स्पर्धेला सुरुवात केली.

प्रमुख पाहुणेदिवाकर पोसनाईक म्हणाले,प्रत्येकाने खेळ खेळले पाहिजेत,खूप व्यायाम केला पाहिजे,खेळातून मुलांची शारीरिक क्षमता वाढीस लागते.सर्व शाळेतील मुलांनी यावेळी ड्रिल सादर करून सर्वांची मने जिंकली .सौ गीता केरकर यांनी आभार व्यक्त केले तसेच अर्जुन गावस ,ओंकार वझे, व चुडामणी गावस यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या क्रीडा मेळाव्यात इयत्ता पहिली,दुसरी,तिसरी आणि चौथीतील मुलांसाठी दोरी उड्या,बटाटे शर्यत,५० मीटर धावणे,१०० मीटर धावणे ,रीले,लिंबू चमचा अश्या अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व मुलांनी अतिशय सुंदर असा सहभाग दर्शविला.सर्व शिक्षक,पालकांनी खूप सहकार्य करून हा मेळावा यशस्वी केला.या क्रीडा मेळाव्याला क्रीडा शिक्षक आनंद गावकर यांचे मार्गदर्शन लाभले.या मेळाव्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी दिलीप गावकर यांनी भूमिका मैदान उपलब्ध करून दिले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

वास्को : राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेतील सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालयास प्रथम बक्षीस देताना माधवी शेट्ये व मान्यवर.

देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २७ : वास्को येथील वाडे नगर उच्च माध्यमिक विद्यालयातर्फे आयोजित केलेल्या अखिल गोवा पातळीवर देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत कवळे – फोंडा येथील श्री सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालयाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

द्वितीय क्रमांक एस. ई. एस. उच्च माध्यमिक विद्यालय बाराजण – उसगाव, तृतीय क्रमांक दीपविहार उच्च माध्यमिक विद्यालय, वास्को, चौथे माउंट मेरी, मडगाव तर पाचवे बक्षीस एम. ई. एस. उच्च माध्यमिक विद्यालय वास्को यांना बक्षिसे मिळाली.

बक्षीस वितरण सोहळा प्रमुख पाहुण्या उद्योजक व समाजसेविका माधवी शेट्ये, मुख्याध्यापक महादेव दाबोळकर, नगरसेवक सुदेश भोसले, रवींद्र भवन बायणाचे अध्यक्ष जयंत जाधव, सूरज नाईक, मंजुनाथ पै, दिनेश सांतीनेशकर, अनघा आर्लेकर यांच्या उपस्थितीत झाला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 146 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .